# स्त्रीवादी चळवळ व महिला सक्षमीकरण

**डॉ. मंगला डाहाट**
*सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख*
*संताजी महाविद्यालय नागपूर*

**प्रस्तावनाः**

1960 नंतरचा कालखंड हा चळवळीनी भारलेला व भरलेला कालखंड आहे. अर्थात या मागे मध्ययुगात घडून गेलेले भक्ती चळवळीचे व सामाजिक चळवळीचे विकास व परिणाम आहेत. त्यासोबतच ब्रिटीशांचे आगमन, त्यांचे विचार, जीवन जगण्याची शैली, साहित्य त्यामुळे गतिमान झालेली प्रबोधन चळवळ आणि या चळवळीला समांतर सुरू असलेली स्वातंत्र्याची चळवळ ही या संपूर्ण चळवळीची पार्श्वभूमी आहे.

1960 नंतरचे सामाजिक जीवन हे अनेक नवे प्रश्न घेवून उभे राहिले सोबतच साहित्यिक वर्तूळातील प्रश्न सुध्दा उभे राहिले. त्या अनुषंगाने विविध चळवळीची निर्मिती झालेली दिसते.

समाजजीवनात अनेक परिवर्तन झाली. ती सर्व परिवर्तने होती ती मानवतावादी नैसर्गिक हक्काची मागणी करणारी होती, मागे पाहता हे सर्व मूलभुत व नैसर्गिक हक्क समाजातील सर्वच स्तरातील लोकांना शतकानुशतका पासून मिळाले नव्हते. आणि याचेच प्रतिबिंब 1960 नतंरच्या साहित्यात चित्रित झालेले दिसते. 1960 नतंर मात्र मराठी साहित्यात खूप मोठे बदल झाले, बदल म्हणण्यापेक्षा क्रांतीच झाली असेच म्हणावे लागेल.

या काळामध्ये निर्माण झालेले जे साहित्य तेच अस्सल व खरे साहित्य होते, कारण या आधी समाजातील सर्वच घटकांचा विचार केला जात नव्हता. इतिहासाची पाने बघता सगळीकडे अराजकता व विषमता ठासून भरलेली होती सर्वसामान्य माणूस हा सर्वच स्तरावर उपेक्षीतच होता. 1960 नतंर मराठी साहित्य खऱ्या अर्थाने 'उपेक्षितांचे जीवनचित्रण' करणारे आणि त्यांच्या वेदना प्रभावीपणे मांडणारे साहित्य ठरले. दलित, ग्रामीण, आदिवासी, जनवादी, ख्रिश्चन, मुस्लीम, अशा अनेक विचारधारा मराठी साहित्यात निर्माण झाल्या. त्यासोबतच एक नविन विचारधारा येवून मिळाली. आणि ती म्हणजे स्त्रीवादी साहित्याची होय. पूर्वी स्त्रिया लेखन करित नव्हत्या असे नाही, पण फार तुरळकपणे कारण समाजव्यवस्थेने त्यांना जगण्याचे हक्क दिले नव्हते तर लेखनाचे व भावना व्यक्त करण्याचे कसे देणार स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याचा विचार केल्यास मध्ययुगीन कालखंडातील महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई बहिणाबाई, पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे यांच्या साहित्याचे योगदान महत्वपूर्ण ठरले. भारतीय स्त्री गुलामगिरीची पार्श्वभूमी लक्षात घेता या सर्वच स्त्रियांचे साहित्यविषयक लेखन हे क्रांतीकारी व परिवर्तनवादी होते. 1960 नतंर जशी दलित साहित्याची चळवळ धडक मारून सामोरी आली, आविष्कृत होऊ लागली व माणसाच्या भावनाचे साहित्य निर्माण करू लागली. तसेच समांतर पध्दतीने एक चळवळ समोर आली ती म्हणजे स्त्रीवादी साहित्याची व स्त्रीवादी चळवळ होय. स्त्रीवादी चळवळीने व साहित्याने स्त्रियांच्या जीवनविषयक अनेक प्रश्नांविषयी संघर्ष केला, लढा दिला स्त्रियांना एक व्यकती म्हणुन समाजात समान अधिकार मिळावा, प्रतिष्ठा मिळावी. हा या चळवळीचा मुख्य उद्देश आहे. स्त्रीकडे बघण्याचा जो एक बुरसटलेला विचार आहे. त्यामध्ये परिवर्तन झाले पाहिजे हे या चळवळीचे मागणे आहे. कायदा बदलला त्याने समानता मिळाली, पण सामाजिक स्तरावर लोकांच्या मानसिकतेत बदल झाला का? हा महत्वाचा प्रश्न आहे.

**1) स्त्रीवाद :**

स्त्रीवाद ही केवळ सैध्दातिक पातळीवरची चर्चा नसून ही चर्चा प्रत्यक्षात उतरवून समाजात बदल घडवुन आणण्याचे आव्हान स्त्रीवादासमोर आहे. शतकानुशतके समाजाचा प्रवास गतानुगतिकतेने झाला. संपुर्ण विश्वात अनेक बदल झाले पण हे बदल वरवरचे आणि पुरूषसत्ताक व्यवस्थेतील बदल आहेत. या व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान दुय्यम असल्यामुळे त्यांच्या आयुष्यात फारसे बदल झालेले दिसत नाही. संपूर्ण व्यवस्थाच लिंगभेदावर आधारित असल्यामुळे हा लिंगभेद जसा नैसर्गिक आहे, त्याच पध्दतीने स्त्रियांचे समाजातील स्थान ही दुय्यम आहे. असे समजण्यावर भर दिला गेला. त्यामुळे पुरूषसत्ताक व्यवस्था प्रबळ झाली आणि स्त्रियांच्या पदरी गुलामगीरी आली हेच अनेक स्त्रीवादी समीक्षकाचे मत आहे. पुरूषसत्ताक व्यस्थेत पुरूषांच्या अधोगतीला किंवा प्रगतीला स्त्रियांच जबाबदार आहे असा विचार केला गेला तरी स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्व असते, हा विचार पूर्वीपासूनच सोयीस्करपणे डावलला गेला. व स्त्रियांना स्वातंत्र्य नसते हे पध्दतशीरपणे स्त्रियांच्या गळी उतरविले गेले. नैसर्गिक लिंगभेदामुळे स्त्री आणि पुरूष यांची कार्यक्षेत्रे वेगवेगळी झाली असेलही असे जरी वरवर वाटत असेल तरी कार्यक्षेत्रे वेगळी असणे ही बाब नैसर्गिक नाही तर ती लादलेली आहे असे अनेक स्त्रीवादी विचारवंतानी स्पष्ट केले आहे. संस्कृतीने केलेल्या अन्याय अत्याचाराची मीमांसा करणे आणि त्यातील लादलेपण स्पष्ट करणे हे स्त्रीवादाचे कार्य आहे. जैविक लिंगभेद स्त्रीवादाने मान्य केला पण सांस्कृतिक लिंगभेदाला स्त्रीवादाने स्पष्टपणे व परकर पणे नकार दिला आहे.

**2. स्त्रीवादी चळवळ :**

स्त्रीवादी चळवळ ही आत्मभान देणारी व मानव मूक्तीची चळवळ आहे. दलित चळवळीतून ज्याप्रमाणे दलित वर्गाचे आत्मभान जागृत झाले आणि त्यांनी आपल्या मानवी अधिकाराची ओळख पटवून घेतली त्याच पध्दतीने स्त्रीवादी वळवळीतून ही स्त्रियांचे आत्मभान जागृत झाले

आणि त्यांनी आपल्या मानवी अधिकाराची ओळख पटवून घेतली व मानवी हक्क प्रस्थापित केले.

भारतात स्त्रीवादी चळवळ प्रथमतः सुरू झाली ती म्हणजे महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई यांच्या कृतिशील कार्याने यामध्ये अनेक महापुरूषांनी अथक परिश्रम केले यामध्ये आगरकर, ताराबाई शिंदे यांचा समावेश आहेच व शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हिंदू कोड बील' जे संसदेमध्ये सादर केले त्यावर आपली प्रचंड मेहनत व अथक परिश्रम घेतले ते पास होवु शकले नाही, हे दुर्देव आहे. पण हा प्रयत्न स्त्रियांच्या उत्थानासाठी खुप मोठा व लक्षात घेण्यासारखाच होता. हा या चळवळीचा पहिला टप्पा, प्रयत्न म्हणता येईल.

त्यानंतर स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा कालखंड ते 1975 या काळामध्ये लिंग निरपेक्ष समानतेचा अधिकार भारतीय घटनेने स्त्रियांना बाहाल केला हा मूलभूत पातळीवरचा प्रयत्न होता. त्याची अमंलबजावणी व त्याची कार्यान्वीतता होत होती. पण कायदे करून प्रश्न सुटत नाही. त्यासाठी समाजाने म्हणजेच समाजाच्या प्रत्येक घटकाने आपली मानसिकता बदलविणे गरजेचे आहे हे 1960 नंतर लक्षात यायला लागले होते. 1950 ते 1975 हा कालखंड एक स्थितीशील कालखंड होता. राजकीय स्वातंत्र्य मिळाले होते. म्हणून खुप आनंदात सर्व जनता होती. पण प्रश्न सोडविले जात नव्हते. संपुर्ण समाजालाच या कालखंडात स्थितीशीलता आलेली होती. त्यामुळे नवनवीन प्रश्न निर्माण होत होते. राजकीय दृष्टया ही हा कालखंड अनेक घडामोडीचा होता त्याचा प्रत्यक्ष परिणाम भारतातील समाजजीवनावर व सर्वच पातळयावर झालेला दिसतो. या सगळया गोष्टीमुळे स्त्रीप्रश्न व त्यांचे जीवन हे बाजुला पडलेले दिसतात. त्यांच्या प्रश्नाविषयी पाहिजे तसे प्रयत्न झालेले दिसत नाही. 1975 हे वर्ष युनोने 'स्त्रीदशक' म्हणून जाहिर केले. आणि जगातील अनेक देशांमध्ये स्त्रियांच्या स्थितीगती विषयी, जीवनाविषयी, जगण्याविषयी विचार करण्याची प्रक्रिया गतिशील झाली. तिला एक वेग प्राप्त झाला. आपल्या देशाबद्दल विचार करता स्त्रियांच्या सामाजिक, कौटुंबिक राजकीय दर्जाविषयी तिच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविषयी विचार सुरू झाला. जागतिक स्त्री दशकाच्या निमित्ताने स्त्रियांच्या प्रगती व अधोगतीचे अहवाल तयार करण्यात आले. माहिती मिळविण्यात आली. यामध्ये असे लक्षात आले की भारतीय स्त्रियांची अवस्था किती दयनीय आहे हे प्रकर्षाने लक्षात आले. आणि मग त्यातून सामाजिक संघटना उदयास आल्या. स्त्रीवादी चळवळीत गतिशिलता निर्माण झाली. पण 1995 ते आजतागायत स्त्रीला व तिच्या चळवळीला मूलभूत प्रश्नांसाठीच लढा दयावा लागला व लागत आहे.

### 3. महाराष्ट्रातील स्त्रीवादी संघटना :

भारतात खऱ्या अर्थाने चळवळ म्हणून स्त्रीया एकत्र आल्या त्या 1975 नंतरच मध्ययुगीन कालखंडापासून प्रबोधन काळापर्यंत स्त्री मुक्तीचे अनेक प्रयत्न झाले. मध्ययुगीन कालखंडात अनेक थोर पुरूष होवून गेले. त्यामध्ये सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, ताराबाई शिंदे यांनी स्त्री प्रश्नासंबंधीचे कृतिशील कार्य याची भक्कम व सशक्त पार्श्वभूमी महाराष्ट्राच्या स्त्रीमुक्ती चळवळीला दिली पण त्या काळामध्ये स्त्रियांच्या संघटनाची बाजु तशी कमीच होती.

1975 नतंर एकंदरीत बदलती सामाजिक व राजकीय परिस्थिती या सोबतच जागतिक घडामोडीचे भारतावर झालेले परिणाम आणि त्यात स्त्रियांच्या समस्यामध्ये झालेली वाढ, नितिमुल्यांची झपाटयाने झालेली घसरण, स्त्रियांकडे बघण्याच्या भोगवादी दृष्टिकोनात झालेली वाढ, जागतिक बाजारपेठेतील व समाजव्यवस्थेतील जीवघेणी स्पर्धा आणि या स्पर्धेमध्ये एक मोहरा म्हणुन स्त्रियांचा झालेला वापर असे अनेक नवे प्रश्न निर्माण झाले. त्यावेळेस शिकलेल्या स्त्रियांची संख्या कमी होती. नौकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या त्यापेक्षाही कमीच होती. हे चित्र तर होतेच पण दुसरीकडे स्त्रियांचा एक मोठा वर्ग आहे की त्या असलेल्या परिस्थितीतच खितपत पडलेल्या आहे. व या अश्या अभावात्मक परिस्थितीला व विरोधाभासाला त्यावेळेसच्या स्त्रीवादी चळवळीला सामोरे जावे लागले, स्त्री मुक्ती चळवळ ही स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्यानंतरचा कालखंड या दोन टप्पातून उभी करून त्या मधुन प्रामुख्याने स्त्री पुरूष समानता स्त्री–स्वातंत्र्य स्त्रियांचे हक्क इ. प्रमुख बाबी मांडण्यात आल्या त्याचा परिणाम स्त्रियांच्या दर्जावर झालेला आहे. त्याचीच मदत घेत भारतीय समाजात स्त्री ही सक्षम होतांना दिसते.

भारतीय समाजात स्त्रियांना कनिष्ठतेचा तसेच दुय्यम दर्जा होता. त्या आधारे निर्माण होणारे प्रश्न सोडविण्यासाठी स्वातंत्र्योत्तर कालखंडात महाराष्ट्रात 1960 नतंर स्त्री पुरूष समानतेला प्रारंभ झाला. 1979 ला दिल्ली येथील अखिल भारतीय महिला परिषदेने महाराष्ट्रांतील स्त्री प्रश्नांची मांडणी केली व नंतर पुण्यात पहिली स्त्री मुक्ती परिषद घेण्यात आली आणि याच परिषदेमधुन महाराष्ट्र राज्य संपर्क समितिची स्थापना करण्यात आली. भारतात व महाराष्ट्रात स्त्रियांसंबधीचे विचार मांडुन वेगवेगळया पातळ्यांवर स्त्रीवादी संकल्पना मांडण्यात आलेल्या आहेत. आणि स्त्रीवादी संकल्पनामध्ये स्त्री सक्षमीकरण महत्वाचे ठरले.

### 4. स्त्री सक्षमीकरण म्हणजे काय?

सक्षम स्त्री म्हणजे जी स्त्री आर्थिक दृष्टीने स्वावलंबी असून स्वतंत्र्यपणे आर्थिक, सामाजिक, राजकीय निर्णय घेण्याचे अधिकार तिला प्राप्त झाले असुन घेतलेल्या निर्णयाला कुटुंब किंवा समाजाची सहमती असते तर अशा स्त्रीला 'सक्षम' अशा स्त्री असे म्हणता येईल. ही स्त्री समाजातील गरीब, श्रीमंत सर्वच स्तरातील असू शकते तसेच कोणत्याही वयाची असु शकते. त्याला 'स्त्री सक्षमीकरण' म्हणतात.

स्त्री सक्षमीकरणाचा शब्दशः अर्थ स्त्रियांना सुदृढ व शक्तीसंपन्न बनविणे होय. परंतु व्यापक दृष्टीने तिचा राजकीय सत्तेत सहभाग कोणतेही कार्य करण्याची, थांबविण्याची क्षमता, देशाच्या सर्वोच्च निर्णय प्रक्रीयेत प्रत्यक्ष भागीदारी, समान संधी, समान कामासाठी समान वेतन कायदयाद्वारे सुरक्षा प्रजननाचा अधिकार यालाच आपण 'स्त्री सक्षमीकरण' म्हणू शकतो.

**5. स्त्री सक्षमीकरणात स्त्री मुक्ती चळवळीचे योगदान**

भारतात स्वातंत्र्यपूर्वकाळात, व स्वातंत्र्य प्राप्ती नंतर समाजसुधारकांनी स्त्रीयांना समान दर्जा प्राप्त व्हावा यासाठी खुप प्रयत्न केले, लढा दिला संघर्ष केला. तसेच स्त्री सक्षमीकरणासाठी शासकीय पातळीवरून काही प्रयत्न झालेले दिसून येतात. त्यामध्ये राज्यघटनेत जी तरतुद केली ती अतिशय महत्वाची होती भारतीय राज्यघटनेमध्ये स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे समान हक्क दिले आहेत. तसेच स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी व त्यांच्या दर्जातील परिवर्तनासाठी राज्यघटनेचा आधार घेत शासकीय पातळीवरून काही योजना तयार करण्यात आल्या आहेत. शासनाच्या स्त्रियांसाठी 'विकास कल्याणकारी योजना', 'स्त्रियांविषयी संशोधन', 'हुंडा विरोधी सेल', 'महिला आयोग' हे शासनाचे विकासात्मक कल्याणकारी प्रयत्न स्त्री अत्याचार विरोधी कायदे यामुळे स्त्रियांना काही प्रमाणात समान संधी मिळाली आहे पण अजुनही स्त्री उपेक्षित दुय्यम व वंचित आहे. भारतीय समाजात स्त्रियांच्या दर्जात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सर्व पातळ्यावर विविध प्रकारचे प्रयत्न झालेली दिसून येत नाही. त्यामुळे स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी व सक्षमीकरणासाठी भारतातील स्त्रियांनी स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या कालखंडात एकत्र येवून त्यातून भारतीय स्त्री मुक्तिची चळवळ अस्तित्वात आणली. व त्या चळवळीने स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी व स्त्रियांच्या सक्षमीकरणासंबंधी प्रयत्न केलेले दिसून येतात.

भारतीय स्त्रियांचा दर्जा व प्रश्न यांचे वास्तव कळण्यासाठी 1974 ला 'महिला आयोग समिती' चा अहवाल प्रसिध्द झाला. त्यातून स्त्रियांच्या स्थितीची वास्तवता समोर आली. पाश्चात्य देशामधून स्त्री मुक्तीवर काम करणाऱ्या स्त्रियांच्या संपर्कात भारतातील शिक्षित स्त्रिया आल्या होत्या. तेथून भारतीय स्त्री मुक्ती चळवळीला वेग प्राप्त झाला. पाश्चात्य स्त्रीमुक्ती चळवळीचा प्रभाव भारतीय स्त्री मुक्ती चळवळीवर पडला. इ.स.1949 ला प्रकाशित झालेले सिमॉन दिबु म्हर यांचे 'दि सेकंड सेक्स' हा ग्रंथ या चळवळीस प्रेरक ठरला आहे. इ.स.1975 युनेस्कोने 'आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष' जाहीर केल्यामुळे पुण्यात स्त्री मुक्ती संघटना स्थापन झाली. स्त्री मुक्ती चळवळीच्या माध्यमातुन स्त्रियांचे प्रश्न, समस्या, वास्तवता स्पष्ट करण्याचा प्रयत्न झालेला आहेत. स्त्रीयांच्या जगण्यातल्या वास्तवता समोर आल्यामुळे स्त्रीयांचा दर्जा उचावण्याचा देखिल प्रयत्न झालेला दिसुन येतो.

**6. स्त्री सक्षमीकरणाचे सबळ प्रयत्न :**

भारतामध्ये प्राचीन काळापासुन स्त्रियांच्या दर्जात परिवर्तन व्हावे यासाठी भारतातील समाजसुधारकांनी अथक प्रयत्न केले असे दिसुन येते. स्त्री स्वातंत्र्यासाठी अनेकानी पुढाकार घेतला. 12 व्या शतकात महानुभाव पंथाचे श्री. चक्रधर स्वामी यांनी स्त्रियांचे स्थान पुरूषांच्या बरोबरीचे मानले, त्यांच्या एकूणच साहित्यातून ते दिसुन येते. त्यांची शिष्या 'महदाईसा' हिच्या चरित्रग्रंथात व अनेक लेखातुन त्याची प्रचिती येते. 13 व्या शतकात संत वाङ्‌मय आपल्याला दिसते ते जनाबाईच्या सामाजिक स्थान लक्षात घेतले तर तिने व्यक्तिगत पातळीवर घेतलेली झेप जनाबाईच्या अभंगातून प्रत्ययाला येते. पण त्यावेळेच्या काळानुसार फक्त भक्तीत ही सुधारणा दिसुन येते, पण स्त्रियांच्या सामाजिक दर्जात मात्र यामुळे फारसे परिवर्तन झाले नाही. स्त्रियांचे हे स्वातंत्र्य व्यक्तिगत पातळीपुरतेच मर्यादित राहिले. स्त्रियांचा सामाजिक दर्जा व, त्याची अवस्था यात परिवर्तन व्हावे यासाठी प्राचीन काळापासुन प्रयत्न झाले. त्यामध्ये तथागत गौतम बुध्दाचा पहिला व महत्वाचा प्रयत्न होय. त्यानंतर बाळशास्त्री जांभेकर, पंडिता रमाबाई, गौपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजर्षी शाहु महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबडेकर, समाजसुधारकांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये स्त्रियांच्या उत्थानासाठी काम केले. आपले परिवर्तन वादी विचार मांडले व स्त्रियांचा जीवन जगण्याचा दर्जा सुधारला, हे स्त्री सक्षमी करणाचे पहिले पाऊल होते. असे म्हणावे लागेल. महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीचा वेध घेतांना पाश्चिमात्य विचारधारेचा महाराष्ट्रावर पडलेला प्रभाव व महाराष्ट्रांची पूर्वपरंपरा ही लक्षात घ्यावी लागेल. मध्ययुगीन कालखंडात निर्माण झालेली भक्ती साहित्याची चळवळ आणि या चळवळीत सहभागी झालेल्या स्त्रियांचे कर्तृत्व याचाही विचार या संदर्भात करावा लागतो. कारण या भक्तिसाहित्याचे व चळवळीचे चांगले आणि वाईट परिणाम भोगतच आज देखील महाराष्ट्रातील सर्वसामान्य स्त्री प्रवास करित आहे. मध्ययुगीन कालखंडात चक्रधर ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंतच्या संत मंडळीनी आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली वर्णभेदाबरोबरच लिंगभेद ही नाकारला त्यामुळे स्त्रिया धर्मसंप्रदायामध्ये सहभागी झाल्या ही पार्श्वभुमी बघता या सर्व धर्म प्रवर्तकाचे धन्यवादच व्यक्त करावे लागेल. पण सामाजिक विषमता या कालखंडात जशीच्या तशीच होती. त्यामुळे सामाजिक विषमतेसोबत स्त्रियांना संघर्ष करावा . लागलाच स्त्रियांनी स्वतःच्या मुक्तिसाठी संघर्ष केला. एकंदरित स्त्री–मुक्तीचा तो देशी कणखर असा पहिला स्वर होता. त्या काळामध्ये स्त्रियांच्या माणूसपणाची भुक दुर्लक्षित केली गेली होती. आध्यात्मिक आणि सांस्कृतिकदृष्टया या स्त्रियांचे उदात्तीकरण केले गेले त्यामुळे सर्वसामान्य पणे स्त्रियांना स्वातंत्र्याची गरज असते हेच नाकारले गेले व अनेकानेक प्रकारे स्त्रियांची अवनती होत गेली. पण त्यातुन आशावादी असलेले असे अनेक प्रयत्न समोर आलेले दिसते.

ब्रिटीश कालखंडामध्ये स्त्री सुधारणेची चळवळ हा कालखंड खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारा कालखंड आहे. 1929 मध्ये राजा राममोहन रॉय यांच्या नेतृत्वाखाली 'सती बंदी' कायदा झाला. त्यानंतरचा प्रयत्न म्हणजे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी तळागाळातील स्त्री–पुरूषांचे प्रश्न समाजाच्या अग्रभागी आणले. शुद्र–अतिशुद्र समाजातील विशेषता मुलींना शिक्षण देण्यासाठी महात्मा फुले यांनी शाळा सुरू केल्या समाजात शिक्षणाचा पाया रचला व सर्व वंचितांना शिक्षण मिळाले पाहिजे असे सर्वकंश प्रयत्न केले त्यात ही स्त्रियांच्या सर्वांगीन विकासासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. जोतिबा

फुले 'सत्यशोधक' होते. अत्यंत निर्मिडपणे त्यांनी समाज व्यवस्थेतील चुकीच्या मुल्यांची चिरफाड केली जातिय व्यवस्थेवर कठोर प्रहार केले. सत्यशोधक समाजाची स्थापना करून मानवतावादाचा पुरस्कार केला. स्त्रियांसह शुद्र व उपक्षित यांचे सामाजिक शोषण थांबावे यासाठी त्यांनी कृतिशील कार्य केले. 'गुलामगीरी', 'सार्वजनिक सत्यधर्म', 'शेतकऱ्यांचा असुड' या ग्रथांमधून महात्मा फुले यांनी आपली भुमिका स्पष्ट केली. महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा विरोध ब्राम्हणांना नव्हता तर तो ब्राम्हण्याला होता. म्हणुनच त्यांनी ब्राम्हण विधवांसाठी अनाथआश्रमांची स्थापना, लैंगीक शोषण झालेल्या स्त्रियांच्या बाळंतपणाची सोय, शिशुगृहाची स्थापना, केशवपनाच्या चालीविरूध्द नाव्ह्यांनमध्ये जनमत घडवून त्यांना संपावर जाण्यासाठी प्रवृत्त करणे यासारखे धाडसी उपक्रम फुले दांपत्याने राबविले.

गोपाळ गणेश आगरकरांनी समाजात असलेल्या अनिष्ट प्रथा, परंपरा या विरूध्द आपले कार्य केले. आगरकरांनी 'सुधारकांची' भुमिका स्विकारून समाजसुधारणेला प्राधान्य दिले. टिळक आणि आगरकार या दोघांमधला आधी राजकीय सुधारणा की आधी सामाजिक सुधारणा हा वाद चांगलाच रंगला त्या काळामध्ये स्त्रियांच्या बाबतीत असलेल्या अनिष्ट रूढी परंपरा यांच्या विरोधात आगरकरांनी आपली मते मांडली व कार्य केले. आपले हे परखड व स्पष्ट मते 'केसरी' या वृत्तपत्रातून प्रसिध्द झाले नाही म्हणून त्यांनी स्वतःचे 'सुधारक' हे वर्तमान पत्र सुरू केले. व त्यातून स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली व स्त्री उत्थानासाठी शेवटपर्यंत कार्य केले. त्यानंतर पंडिता रमाबाई यांच्या कार्याची दखल घ्यावी लागेल. पंडिता रमाबाईनी केलेल्या धर्मांतराच्या मुदयावर सुधारकांमध्ये मतभेद निर्माण झाले पण ते कार्य अत्यंत महत्वपूर्ण आहे. त्यांचे ते कार्य परिवर्तनवादी कार्य होय. हिंदु धर्मात सुधारणा होवु शकत नाही. हे पंडिता रमाबाईचे ठाम मत होते म्हणून त्यांनी धर्मांतरावर भर दिला व स्वतः ख्रिश्चन धर्म स्वीकारला त्या अत्यंत बुध्दीवादी होत्या त्यामुळे त्यानुसारच त्या जगल्या व कार्य केले.

यानंतर अत्यंत महत्वपूर्ण झालेला प्रयत्न म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य होय. महात्मा फुले यांच्या मानवमुक्तीचा लढा पुढील कालखंडात डॉ. आंबेडकरांनी तीव्र केला. डॉ. आंबेडकरांनी जाती अंताचा लढा उभारला, जातीय व्यवस्थेमुळे स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची तीव्रता वाढली होती. स्त्रियांवर बंधनांची पकड खुप घट्ट होती. संपुर्ण स्त्रीवर्गामध्ये डॉ. आंबेडकरांनी जागृतता निर्माण केली. देवदासी, तमाशातील, स्त्रिया वेश्या, अशा ठिकाणी दलित स्त्रियांचा सर्रास वापर केला जातो. हे त्यांनी लक्षात आणुन दिले. डॉ. आंबेडकरांनी फुल्यांच्या पावलावर पाऊल टाकुन शिक्षणावर भर दिला व शिक्षण समाजातील सर्व घटकाला मिळावे यासाठी व अस्पृश्यांना आपले हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी पराकोटीचे प्रयत्न केले. हिंदु कोड बिलाची अत्यंत अभ्यासपुर्ण मांडणी करून हिंदु स्त्रीयांना कायदयाने मानवी हक्क बाहाल करण्याचा प्रयत्न केला. पण दुर्देवाने ते बील पास होवु शकले नाही. आपल्या न्याय मानवी हक्कांसाठी डॉ. आंबेडकरानी हिंदु धर्माचा त्याग करून विज्ञाननिष्ठ व ज्या मध्ये प्रज्ञा, शिल करूणा, मैत्री, स्वातंत्र्य व मानवता या इहवादी तत्वावर असलेल्या बौध्द धम्माचा स्वीकार केला व आपल्या अनुयाना सुध्दा दिला. डॉ. आंबेडकरांच्या खंबीर नेतृत्वामुळे दलित स्त्रियांना आपल्या अधिकाराची जाणीव झाली. व हीच एक क्रांतीकारी सुरूवात होती असे म्हटले तरी वावगे होणार नाही. भारतीय समाजातुन अस्तित्वात आलेली स्त्री मुक्तीची चळवळ व स्त्रीवादी प्रवाह हे स्त्री सक्षमीकरणसाठी महत्वाचे ठरलेले आहे. सर्व समाजातील स्त्रियांना दुय्यम समजुन त्यांचे प्रश्न सारखे असतात. त्यामुळे त्यांचे दुय्यमत्व कमी करून त्यांना सक्षम करण्यासाठी वेगवेगळे विचार घेवुन स्त्री मुक्ती चळवळीतुन स्त्रीवादी प्रवाह समोर आले.

उदारमतवादी, स्त्रीवादी प्रवाह, समान शिक्षण, समानसंधी, मार्क्सवादी स्त्रीवादी प्रवाहाने स्त्रीपुरूष समानता, समाजवादी स्त्रीवादी प्रवाह, जागतिकीकरण व भांडवलशाही व्यवस्थेचा परिणाम, मनोविश्लेषणात्मक स्त्रीवादी प्रवाहाने स्त्रियांमधील कमतरता यावर भर दिला आहे. या सर्व स्त्रीवादी प्रवाहांचा आधार घेत समाजातील काही स्त्रिया या सक्षमीकरणाकडे वाटचाल करत सक्षम झाल्या आहेत. परंतु भारतीय समाज हा जातीव्यवस्थेवर आधारित असल्यामुळे जातीचा प्रभाव व स्त्रीयांचा या दर्जा भुमिकेवर पडत असतो. त्यामुळे स्त्रीवादी प्रवाहामधुन हे प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी झालेले प्रयत्न हे उच्च जातितील शिक्षित स्त्रीसाठी झाले. स्त्रियांसाठीच झाले आहेत असतेच लक्षात येते. दलित स्त्री ही या प्रवाहापासून दूर राहिलेली आहे. त्यामुळे दलित स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी, त्यांचे प्रश्न समजुन घेण्यासाठी, दलित स्त्रीवादी दृष्टीकोणाने, विचार करण्यात आला. त्यामध्ये दलित स्त्रियांचे प्रश्न चौफेर दृष्टीने समजुन घेण्यात आले. व समाजापुढे मांडण्यात आले. त्यामुळे दलित स्त्री सक्षमीकरणाकडे वाटचाल करतांना दिसून येते. दलित स्त्रीवादी प्रवाहाची मदत दलित स्त्रियांना सक्षमीकरणासाठी झालेली आहे. असे चित्र आपल्याला संपुर्ण भारतात दिसून येत आहे व ते खुप आशावादी आहे.

**निष्कर्ष :**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात स्त्रियासमोर अनेक प्रश्न, समस्या, आव्हाने उभी आहेत. पण आजची आधुनिक स्त्री या सर्व समस्यांना, आव्हानाना सामोरी जात आहे व अनेक क्षेत्रात आपले वर्चस्व सिध्द करित आहेत. सर्वच प्रकारच्या जबाबदाऱ्या पेलण्याची ताकद त्यांच्यामध्ये आहे व त्यामुळे विविध क्षेत्रामध्ये त्या आपल्या कार्याचा व कर्तृत्वाचा ठसा उमटवित आहेत. जागतिकीकरणाच्या युगात जीवन खुप गतीमान होवुन आधुनिक जीवन शैलीने व्याप्त आहे. त्यामुळेच उंचावलेल्या अपेक्षा व स्वतःच्या महत्वांकाक्षा या सर्व आघाड्यांवर पूर्ण सामर्थ्यानिशी व ताकदीने त्यासामोऱ्या जात आहे. त्याच्या या उत्कर्षात अनेक अडथळे आहे पण स्वतःचे कसब व कौशल्य वापरून त्या नवनवीन आव्हानांना झेलत आहेत.

महिला सक्षमीकरण ही साधारण बाब नाही कारण सक्षमीकरण हे स्त्रियांमध्ये नेतृत्व गुण विकसित करू शकत सोबतच भारताच्या विकासाला आणि प्रगतीला हे सक्षमीकरण प्रोत्साहन देणारे आहे. त्यामुळे स्त्रीयांची प्रगती कोणीच रोखु शकणार नाही. यासाठी सर्वांगीण प्रयत्न ही आजच्या काळाची गरज आहे. सोबतच पुरूषांची मानसिकता बदलविणे आवश्यक आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भारतीय समाजातुन अस्तितवात आलेली स्त्रीमुक्तीची चळवळ व स्त्रीवादी प्रवाह हे स्त्री सक्षमीकरणासाठी महत्वाचे ठरलेले आहे, सर्व समाजातील स्त्रियांना दुय्यम समजुन त्यांचे प्रश्न सारखेच असतात त्यामुळे त्या दिशेने प्रयत्न करून सर्व समाजातील स्त्रियांचे दुय्यमत्व कमी करून त्यांचा दर्जा उंचावणे त्यासाठी वेगवेगळे विचार घेवून स्त्री मुक्ती चळवळीतुन स्त्रीवादी प्रवाह जसे, उदारमतवादी, मार्क्सवादी, समाजवादी, मनोविश्लेषणात्मक प्रवाहाने स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले. त्यामुळे सर्वसमाजातील व सर्व स्तरातील स्त्रिया सक्षम बनत गेल्या. या स्त्री सक्षमीकरणात स्त्रीवादी चळवळीचा खूप मोठा वाटा आहे, असे म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ :**

1. *डॉ. वंदना महाजन, 'स्त्रीवाद आणि मराठी साहित्य' विजय प्रकाशन, नागपुर 2013*
2. *सुशिला गोखले – :'स्त्री मुक्ती केव्हा व कशी', महिला आंदोलन पत्रिका मुबंई, 1984*
3. *कुमुद पावडे – 'दलित स्त्रियांना जाणवणारा जातीयवाद' बायजा प्रकाशन पुणे मे – जुन, 2002*
4. *छाया दातार, मंगल खिवसरा 'सत्यशोधक मार्क्स वादी स्त्री मुक्ती विशेषांक' स्वरूप प्रकाशन पुण, 2005*
5. *शुभांगी गोटे ' महिला सक्षमीकरण स्वरूप व समस्या वरद प्रकाशन, औरंगाबाद 2004*
6. *वंदना सोनाळकर 'स्त्रिया आणि समाज परिवर्तन', क्रांतिसींह नाना पाटील अकादमी, नाशिक, 1997*
7. *डॉ. भालचंद्र फडके 'मराठी लेखिका चिंता आणि चिंतन' श्रीविद्या प्रकाशन, पुणे.*
8. *मीनाक्षी मुन, 'फुले आंबेडकरी स्त्री चळवळ' समता प्रकाशन नागपूर.*
9. *डॉ. रवींद्र शोभणे 'जागतिकीकरण, समाज आणि मराठीसाहित्य', विजय प्रकाशन, नागपुर.*